प्रेसनोट दि. १२/१०/२०१७

**हडपसर परिसरातील बँकेची कॅश वाहतूक करणारे गाडीवर दरोडा घालण्याच्या तयारीत आलेल्या दरोडेखोरांना गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक पथकाकडून अटक करण्यात आली आहे.**

दि. ०७/१०/२०१७ रोजी दरोडा प्रतिबंधक पथकातील वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र कदम यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पोलीस अभिलेखावरील जबरीचोरी करणारा गुन्हेगार व त्यांचे साथिदार हे हडपसर परिसरात बँकेची कॅश वाहतुक करणारे गाडीवर दरोडा टाकणार असुन ते मंतरवाडी चौक कात्रज बायपास रोडवर असलेल्या वर्टेक्स इंजिनिअरींग कंपनीच्या जवळ मोकळे जागेत फुरसुंगी येथे त्यांचे मोटार सायकीलसह थांबलेले आहेत. अशी खात्रीशिर बातमी मिळालेने दरोडा प्रतिबंधक पथकाचे पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र कदम यांनी अधिनस्त पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांची दोन वेगवेगळी पथके तयार करुन मंतरवाडी चौक कात्रज बायपास रोडवर असलेल्या वर्टेक्स इंजिनिअरींग कंपनीच्या जवळ मोकळे जागेत फुरसुंगी येथे काही तरुण त्यांचेजवळ असलेल्या मोटार सायकलीवर थांबलेले असल्याचे निदर्शनास आले असता पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम व त्याच्याकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी अचानकपणे सदर ठिकाणी १४.५० वा. छापा टाकुन मोटार सायकलीवरील दरोड्याच्या तयारीत असणा-या इसमांना जागीच पकडण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांनी पळुन जाणेचा प्रयत्न केला असता, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांनी स्टाफचे मदतीने योग्य तो बळाचा वापर करुन सहा जणापैकी पाचजनांला पकडुन ताब्यात घेतले आहे. त्यांची नावे १) राज ऊर्फ दादा दत्तात्रय वायकर वय-२३ वर्षे रा. थिटे वस्ती, दिघे हॉस्पीटल जवळ, पुणे, २) सोमेश किसन गायकवाड वय-२४वर्षे रा. गायरानवस्ती केशवनगर, मुंढवा, पुणे, ३) संजय दत्तू कंधारे वय-२६ वर्षे रा.म्हातोबा नगर, सर्व्हे नं.१०६, कोथरुड, पुणे, ४) विश्वास रामेश्वर कुरंगळे वय - २६ वर्षे रा. उबाळेनगर, साई-सत्यम पार्क, वाघोली, पुणे व ५) बालाजी तुकाराम बेलसरे वय-३६ वर्षे रा.क्रांतीसेना बोर्डाचेसमोर सुतारदरा कोथरुड पुणे अशी आहे. तसेच त्यांचेपैकी एक इसम कात्रजच्या दिशेने पळुन गेलेला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींनी पळुन गेलेल्या इसमाचे नाव अमोल क्षिरसागर, रा. बोपखेल, पुणे असे असल्याचे सांगितले आहे.

दरोडेखोरांचे ताब्यातुन ४ मोटार सायकली, एक स्टीलचा चाकु, एक स्टीलचा चॉपर, एक फोल्डींगचा चाकु, एक छ-यांची पिस्टल, सेल्फ डिफेन्स स्प्रे व एक स्टिलची बनावट पिस्टल असा सर्व मिळुन **कि.रु. ३,२२,२५०/- चा माल** दरोडयाची साधने व प्राणघातकशस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. अटक आरोपीविरुध्द **हडपसर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर ९७५/२०१७ भादवि कलम ३९९, ४०२, आर्म अॅक्ट कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)** प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे.

**नमुद आरोपींनी एक आठवडयापुर्वी डुक्करखिंड,वारजे माळवाडी येथुन भरदिवसा एका मोपेड सायकल स्वारास शस्त्राचा धाक दाखवुन ४ लाख २३हजार रुपये रोख जबरीने चोरुन नेले होते. प्रस्तुत प्रकरणी वारजे पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ३६६/१७, भादंवि कलम ३९२, ३४ हा गुन्हा दाखल असुन सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.**

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, श्री प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त श्री पंकज डहाणे, मा. सपोआ गुन्हे-१, श्री सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे दरोडा प्रतिबंधक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक विद्युलता चव्हाण, लक्ष्मण ढेंगळे, पोलीस उप निरीक्षक संजय दळवी, पोलीस कर्मचारी यशवंत आब्रे, शंकर पाटील, विनायक पवार, दिपक निकम, निलेश पाटील, दत्तात्रय काटम, अजय थोरात, राहुल घाडगे, प्रमोद गायकवाड, महेश कदम, मल्लिकार्जुन स्वामी, सचिन गायकवाड, बशीर सय्यद, रामदास गोणते, परवेज जमादार, विल्सन डिसोजा, चेतन गोरे, संदिप ठाकुर, धनाजी पाटील व प्रविण जाधव यांनी केली आहे.